

# परिचय शास्त्रज्ञांचा | Introduction to scientists


| शास्त्रज्ञ | फोटो | शोध |
|---|---|---|
| मायकेल फॅरेडे (1791-1867) |  | 1. त्यांनी विद्युतचुंबकीय प्रवर्तनाचे नियम शोधून काढले.<br>2. तसेच विद्युतअपघटनाचेही नियम शोधून काढले. |
| जेम्स प्रेस्कॉट ज्यूल (1818-1889) |  | 1. 'पदार्थाच्या सूक्ष्म कणांची गतिज ऊर्जा उष्णतेच्या स्वरूपात बाहेर पडते, तसेच निरनिराळ्या ऊर्जेचे एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरूपात रुपांतरण होते हे त्यांनी प्रथम दाखवून दिले.<br>2. उष्णता स्वरूपातील ऊर्जेच्या रुपांतरणातूनच पुढे थर्मोडायनॅमिक्स या विज्ञानशाखेचा पहिला सिद्धांत प्राप्त होतो.<br>3. ऊर्जेच्या मोजमापासाठीच्या एककाला ज्यूल (J) ही संज्ञा देण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ओरस्टेड (1777-1851) |  | 1. हान्स ख्रिस्तियन ओरस्टेड यांनी 'विद्युतचुंबकत्व' समजून घेण्यात मोलाची कामगिरी बजावली.<br>2. सन 1820 मध्ये त्यांना असे दिसून आले की एका धातूच्या तारेतून विद्युतधारा गेली तर तारेजवळची चुंबकसूची काही कोनातून वळते.<br>3. विद्युत आणि चुंबकत्वाचा संबंध त्यांनीच नजरेस आणून दिला. त्यांच्या सन्मानार्थ चुंबकीय क्षेत्राच्या तीव्रतेच्या एककाला 'ओरस्टेड' (Oersted) संबोधले जाते. |
| दिमित्री मेंडेलीव्ह (1834-1907) |  | 1. त्यांनी मूलद्रव्यांच्या अभ्यासाच्या हेतूने प्रत्येक ज्ञात मूलद्रव्यासाठी एकेक कार्ड बनवून त्यावर मूलद्रव्याचे अणुवस्तुमान दर्शवून अणुवस्तुमान व गुणधर्म यांच्या आधारे कार्डांची जी जुळणी केली त्यातून मूलद्रव्यांच्या आवर्तसारणीचा शोध लागला. |

| | | |
|---|---|---|
| विक्रम साराभाई |  | 1. यांना भारतीय अंतराळ कार्यक्रमांचे जनक म्हटले जाते.<br>2. त्यांच्या प्रयत्नांतून फिजीकल रिसर्च लॅबोरेटरी (PRL) या संस्थेची स्थापना करण्यात आली.<br>3. 1962 साली भारत सरकारने त्यांच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय अंतराळ संशोधन समिती' ची स्थापना करून 1963 साली देशातील पहिले उपग्रह प्रक्षेपण केंद्र थुंबा येथे स्थापन केले गेले.<br>4. त्यांच्या प्रयत्नांतूनच भारताचा पहिला उपग्रह आर्यभट्ट अंतराळात सोडला होता.<br>5. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (ISRO) स्थापनेत त्यांचे महत्त्वाचे योगदान होते. |
| अँम्पिअर |  | 1. यांनी विद्‌युत धारेवर आधारित प्रयोग केले, त्यांच्या कार्यामुळेच आज आपण वाहक तारेतून वाहणारी विद्‌युतधारा मोजू शकतो.<br>2. त्यांच्या या कार्याच्या सन्मानार्थ विद्‌युतधारेच्या एककास 'अँम्पिअर' हे नाव दिले. |

| | | |
|---|---|---|
| जॉर्ज सायमन ओहम |  | 1. जर्मन भौतिक शास्त्रज्ञाने विद्युत वाहकातील रोध मोजण्यासाठी नियम प्रस्थापित केला.<br>2. त्यांच्या सन्मानार्थ रोधाच्या एककास 'ओहम' हे नाव देण्यात आले आहे. |
| फ्रेंच शास्त्रज्ञ प्रूस्ट (J. L. Proust) |  | 1. यांनी सन 1794 मध्ये स्थिर प्रमाणाचा नियम मांडला, "संयुगाच्या विविध नमुन्यांमधील घटक मूलद्रव्यांचे वस्तुमानी प्रमाण नेहमी स्थिर असते.<br>2. " उदा, पाण्यातील हायड्रोजन व ऑक्सिजनचे वस्तुमानी प्रमाण 1:8 असते; म्हणजेच 1 ग्रॅम हायड्रोजन व 8 ग्रॅम ऑक्सिजन यांच्या रासायनिक संयोगाने 9 ग्रॅम पाणी तयार होते. |

| | | |
|---|---|---|
| आनत्वान लॅव्हाझिए (1743 ते 1794) |  | 1. त्यांना आधुनिक रसायनशास्त्राचा जनक म्हणतात.<br>2. ऑक्सिजन व हायड्रोजनचे नामकरण केले<br>3. ज्वलनात पदार्थाचा ऑक्सिजनशी संयोग होतो हे सिद्ध केले.<br>4. रासायनिक प्रयोगात अभिक्रियाकारके व उत्पादितांचे अचूकपणे वस्तुमान मोजण्याच्या पद्धतीचा प्रथम वापर केला.<br>5. पाणी हे हायड्रोजन व ऑक्सिजन यांच्यापासून बनलेले आहे याचा शोध.<br>6. रासायनिक अभिक्रियेत वस्तुमान कायम राखले जाते या नियमाचे पहिले लेखन.<br>7. संयुगांना पद्धतशीरपणे नावे दिली उदा, सल्फ्यूरिक आम्ल, कॉपर सल्फेट इत्यादी.<br>8. 1789 मध्ये Elementary Treatise on Chemistry हा आधुनिक रसायनशास्त्रातील पहिला ग्रंथ लिहिला. |
| अलेक्झांडर फ्लेमिंग |  | 1. जगातील पहिले प्रतिजैविक (Antibiotic) - पेनिसिलीन चा शोध. |

| | | |
|---|---|---|
| जस्टस् वॉन लिबिग |  | 1. यांनी साध्या काचेच्या तुकड्याच्या एका सपाट पृष्ठभागावर चांदीचा लेप दिला व आरसा तयार केला. यालाच रजतकाच परावर्तक असे म्हणतात. |
| वोहलर |  | 1. यांनी अमोनिअम सायनेट या असेंद्रिय संयुगापासून युरीआ संश्लेषित केला. |
| अर्नेस्ट रूदरफोर्ड (1871-1937) |  | 1. या ब्रिटिश पदार्थविज्ञान शास्त्रज्ञाने जे.जे. थॉमसन यांच्या मार्गदर्शनाखाली कॅव्हेंडीश यांच्या प्रयोगशाळेत आणि कॅनडातील मॅकगिल विद्यापीठात किरणोत्सारावर संशोधन केले.<br>2. अल्फा कणांचा मारा करून त्यांनी नायट्रोजन अणू विभागून दाखवले. |

| | | |
|---|---|---|
| जॉलिओ क्यूरी व आयरीन जॉलिओ क्यूरी |  | 1. फ्रेडरिक जॉलिओ क्यूरी व आयरीन जॉलिओ क्यूरी या दांपत्याने प्रथम प्रवर्तित किरणोत्सर्गाचा शोध लावला.<br>2. या शोधाबद्दल त्यांना 1935 साली नोबल पुरस्कार देण्यात आला. |
| ग्रेगर जोहान्स मेंडेल |  | वाटाण्याच्या झाडांवर प्रयोग करून त्यांतील काही लक्षणांच्या आनुवंशिकतेचा त्याने अभ्यास केला. |
| हान्स लिपर्शे |  | 1. चश्मा तयार करणाऱ्या हान्स लिपर्शे या संशोधकाने 1608 मध्ये दोन भिंगे एकमेकांसमोर धरून पाहिल्यास दुरची वस्तू जवळ दिसते याचा शोध लावला व पहिली दुर्बीण तयार केली. |